जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUL 2024
पुढारी

# उन्हाळी सत्र परीक्षेला ७११ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरची ७११ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापीठ उन्हाळी सत्रातील अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ लॉ या अभ्यासक्रमांच्या परीक्षा संलग्न महाविद्यालयामध्ये झाल्या. परीक्षेला ७११ विद्यार्थी बसले. त्यापैकी ७५ विद्यार्थी गैरहजर होते. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUL 2024
लोकमत

# विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी केली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. नीलेश बनसोडे, सुरेश बंडगर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.